# प्रेसनोट दि. ०१/०८/२०२५

**नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपालिका येथील उप संचालक यांचे विरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने अपसंपदेचा गुन्हा दाखल केल्याबाबत**

| | | |
|---|---|---|
| अॅन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे |
| गुन्हा नोंद क्रमांक | :– | आचोळे पोलीस स्टेशन, मिरा–भाईदर वसई–विरार पोलीस आयुक्तालय गुन्हा रजि.नंबर ३३०/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध (सुधारीत २०१८) अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ब) सह १३ (२) प्रमाणे. |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | :– | श्री.वाय.एस.रेड्डी, उप संचालक, नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपालिका, जि. पालघर, |
| मिळुन आलेली अपसंदपदा | :– | १) रु २३,२५,५०,९००/– किंमतीचे सोन्याचे व हिरेजडीत दागिने २६३३८.००० ग्रॅम वजनाचे २) रु ८,०३,१२,०००/– रोख रक्कम व ३) रु १९,९५,०००/– रोख रक्कम अशी एकुण ३१,४८,५७,९००/– रु |
| थोडक्यात हकीगत | :– | यातील लोकसेवक श्री.वाय.एस.रेड्डी, उप संचालक, नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपालिका, जि. पालघर व श्री.सिताराम गुप्ता माजी नगरसेवक, बहूजन समाज आघाडी यांचे विरूध्द प्रवर्तक निदेशालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दाखल मनी लॉन्ड्रींग गुन्ह्याचे तपासाचे अनुषंगाने गैरअर्जदार श्री.वाय.एस.रेड्डी, उप संचालक, नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपालिका, जि. पालघर यांचे हैदराबाद व नालासोपारा येथील पत्यावर दि. १४/०५/२०२५ व दि. ०३/०६/२०२५ रोजी छापे टाकले असता, गै.अ. लोकसेवक श्री.वाय.एस.रेड्डी, उप संचालक, नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपालिका, जि. पालघर यांचेकडे १) रु २३,२५,५०,९००/– किंमतीचे सोन्याचे व हिरेजडीत दागिने २६३३८.००० ग्रॅम वजनाचे २) रु ८,०३,१२,०००/– रोख रक्कम व ३) रु १९,९५,०००/– रोख रक्कम अशी एकुण रु ३१,४८,५७,९००/– मिळुन आली आहे. लोकसेवक श्री.वाय.एस.रेड्डी, उप संचालक, नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपालिका यांनी सदर अपसंपदा त्यांचे ज्ञात उत्पन्नापेक्षा जास्त मालमत्ता गैरमार्गाने संपादित केल्याचे दिसुन येत असल्याने व फौजदारी पात्र गैरवर्तन असल्याने त्यांनी भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन २०१८) आधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ब) सह १३(२) प्रमाणे अपसपंदेचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्याअनुषंगाने लोकसेवक श्री.वाय.एस.रेड्डी, उप संचालक, नगररचना विभाग वसई विरार शहर महानगरपालिका यांचे विरूध्द आचोळे पोलीस ठाणे, मिरा–भाईदर–वसई–विरार पोलीस आयुक्तालय येथे गुरक्र २३०/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध (संशोधन २०१८) आधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (ब) सह १३(२) प्रमाणे दि. ०१/०८/२०२५ रोजी २२.४७ वा. गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी– मा.श्री.शिवराज पाटील सो. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

१) संपर्कपत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेतस्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोलफ्री क्र. :– १०६४
६)दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

(सुहास शिंदे)
अपर पोलीस अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

Scanned with CamScanner